# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२, जिल्हा – रत्नागिरी (महाराष्ट्र)

निम्नस्तर कृषि शिक्षण

जा. क्र. डॉबासाकोकृवि/निकृशि/ ३७७ /२०१९ दिनांक - 9 AUG 2019

## परिपत्रक

**विषयः— मत्स्य अभियांत्रिकी पदविका, कृषि तंत्र निकेतन व कृषि तंत्र पदविका (२ वर्षे कालावधी मराठी माध्यम) अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा भरण्यासाठी विद्यालयस्तरीय विशेष प्रवेश फेरी राबविणेबाबत ...... सन २०१९—२०२०**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सन २०१९—२० या शैक्षणिक वर्षाच्या कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये ग्रामीण भागातील बरेचसे विद्यार्थी काही कारणास्तव प्रवेशापासून वंचित राहिले असून प्रवेश कालावधी वाढवून मिळणेबाबत कृषि पदविका विद्यालयांच्या प्राचार्यांचे विनंती पत्र या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

यास्तव उपरोक्त परिस्थिती पहाता कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहणार आहेत. ही बाब विचारात घेता व कृषि तंत्र निकेतन/विद्यालयांचे प्राचार्य यांनी केलेल्या विनंती नुसार कृषि पदविका अभ्यासक्रमास प्रवेशोच्छुक उमेदवारांना प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यासाठी पूर्वी प्रमाणेच ऑफलाईन प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळ **www.dbskkv.org** वरुन प्रिंट काढून स्वहस्ताक्षरामध्ये भरावे. यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावरील कृषि पदविका माहिती पुस्तिका २०१९—२० मधील सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

१. यापूर्वी ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्ज सादर केला आहे परंतू त्यांनी काही कारणास्तव अंतिम प्रवेश निश्चित केलेला नाही अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नसून उपरोक्त दिनांकास प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित विद्यालयामध्ये विद्यालयांत उपस्थित राहून सहभागी होवून आपला प्रवेश गुणवत्तेनुसार निश्चित करुन घ्यावयाचा आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे यापूर्वीचे अर्ज काही कारणास्तव रद्द झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करुन विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित राहावे.

२. ज्या विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश अर्ज सादर करावयाचे आहेत त्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या **www.dbskkv.Org** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिका २०१९—२० मधील सुचनांचे तंतोतंत पालन करुन विद्यापीठ संकेतस्थळावरील अर्जाची प्रिंट काढून स्वहस्ताक्षरात भरुन ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या कृषि विद्यालयात विहित शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकीत व मूळ प्रतींसह दि. १३/८/२०१९, दि. १४/८/२०१९, व १६/८/२०१९ या कालावधीत प्रत्येक दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी १.३० या कालावधी पर्यंत उपस्थिती नोंदविणे व प्रवेशासाठी विद्यार्थीने स्वतः सहभागी होणे अनिवार्य आहे.

वरिल अ. क्र. १ ते २ येथील उमेदवारांची गुणवत्ता व आरक्षण विचारात घेवून प्रत्येक दिवशी उपरोक्त दिनांकास व विहित वेळेत प्राप्त अर्जाची छानननी करुन प्रत्येक दिवशीच्या अंतिम राज्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हाबंदी न ठेवता) उमेदवारांना प्रवेश वाटप करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादी ही त्याच

दिवसा करिता मर्यादित राहील. यासाठी खालील प्रमाणे विद्यालयस्तरीय जागेवरील (Spot Admission Round) विशेष प्रवेश फेरीचा प्रवेश कार्यक्रम निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | | |
|---|---|---|---|---|
| २ | ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या विद्यालयात प्रवेश अर्जासह मूळ कागदपत्रे व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती व प्रवेश अर्ज शुल्कासह (रु.४००/— खुला प्रवर्ग व रु. २००/— आरक्षित प्रवर्ग) उमेदवाराने उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा कालावधी. | १ | १३/८/२०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत |
| | | २ | १४/८/२०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत |
| | | ३ | १६/८/२०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत |

कृषि तंत्र निकेतन व कृषि तंत्र पदविका (२ वर्षे कालावधी मराठी माध्यम) प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका विद्यापीठाच्या **www.dbskkv.org** या संकेतस्थळावर दि. १२/०६/२०१९ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांचा विद्यालयनिहाय तपशिल विद्यापीठ संकेतस्थळावर दिनांक १३/८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**उपरोक्त प्रवेश कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर तारखेस व वेळेत कुठल्याही प्रकारे प्रवेश अर्ज विद्यालयांत स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.**

**सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.)**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जिल्हा — रत्नागिरी.

प्रत माहितीसाठी सविनय सादर....

१. मा. अधिष्ठाता, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२. मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

प्रत — माहिती व पुढील कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित.

१. सर्व प्राचार्य कृषि तंत्र विद्यालय/निकेतने

२/— यांना कळविणेत येते की, सदरचे परिपत्रक विद्यालय नोटीस बोर्डवर व स्वखर्चाने स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन अथवा इतर स्त्रोतांमधून प्रसिध्द करण्यात यावे.

२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

२/— आपणांस विनंती करण्यात येते की सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.